International Journal of Advanced Research and Multidisciplinary Trends (IJARMT)
An International Open Access, Peer-Reviewed Refereed Journal
Impact Factor: 6.4 Website: https://ijarmt.com ISSN No.: 3048-9458

# माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर शैक्षणिक आणि सामाजिक घटकांचा प्रभाव : शोध अभ्यास

**ज्योती पांडुरंग इंगळे**
संशोधक विद्यार्थी, शासकीय अध्यापक महाविद्यालय, (IASE) छ. संभाजीनगर
**प्रा. डॉ. बी. पी. सुभेदार**
संशोधन मार्गदर्शक, शासकीय अध्यापक महाविद्यालय (IASE) छ. संभाजीनगर

## सारांश

प्रस्तुत संशोधनाचा उद्देश माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर परिणाम करणाऱ्या शैक्षणिक आणि सामाजिक घटकांचा अभ्यास करणे हा आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील यशामागे केवळ बौद्धिक क्षमता कारणीभूत नसून शाळेतील अध्यापन, शिक्षकांचे मार्गदर्शन, अभ्याससाहित्य, पालकांचे शैक्षणिक वातावरण, मित्रपरिवार, घरातील आर्थिक व सामाजिक परिस्थिती यांसारखे विविध घटकही महत्त्वाची भूमिका बजावतात. या संशोधनासाठी छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील एका माध्यमिक शाळेतील 100 विद्यार्थ्यांचा नमुना निवडण्यात आला. संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून माहिती संकलनासाठी प्रश्नावली साधनाचा वापर करण्यात आला. संकलित माहितीचे विश्लेषण टक्केवारी पद्धतीने करण्यात आले. संशोधन निष्कर्षांनुसार विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर शैक्षणिक आणि सामाजिक घटकांचा लक्षणीय प्रभाव दिसून आला. विशेषतः शैक्षणिक वातावरण, शिक्षकांचे सहकार्य, घरातील अभ्यासासाठी अनुकूल वातावरण, पालकांचे लक्ष आणि सामाजिक पाठबळ हे घटक विद्यार्थ्यांच्या कार्यप्रदर्शनाशी संबंधित असल्याचे स्पष्ट झाले.

**मुख्य संबोध:** माध्यमिक शिक्षण, शैक्षणिक संपादणूक, शैक्षणिक घटक, सामाजिक घटक, सर्वेक्षण पद्धती, प्रश्नावली, टक्केवारी विश्लेषण

## 1. प्रस्तावना

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीचा प्रश्न हा शिक्षणक्षेत्रातील अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील विषय आहे. शाळेतील अध्यापन, अभ्यासक्रम, शिक्षकांचे कौशल्य, शैक्षणिक साधनसामग्री, पालकांचे मार्गदर्शन, घरातील वातावरण, मित्रगट, सामाजिक परिस्थिती, आर्थिक स्तर, कुटुंबातील शिक्षणाचे महत्त्व इत्यादी अनेक घटक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशावर थेट किंवा अप्रत्यक्ष प्रभाव

टाकतात. माध्यमिक स्तर हा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा, बौद्धिक प्रगल्भतेचा आणि शैक्षणिक दिशा ठरविण्याचा महत्त्वाचा टप्पा असतो. या स्तरावर विद्यार्थ्यांवर अभ्यासाचा वाढता ताण, स्पर्धा, सामाजिक अपेक्षा, कुटुंबीयांचे दबाव, मित्रपरिवाराचा प्रभाव आणि शैक्षणिक अनुकूलतेचा प्रश्न अधिक तीव्रतेने जाणवतो. म्हणूनच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर शैक्षणिक घटक (उदा. शिक्षकांचे मार्गदर्शन, अभ्याससाहित्य, शाळेचे वातावरण, गृहपाठ, नियमितता) आणि सामाजिक घटक (उदा. पालकांचे शिक्षण, घरातील वातावरण, मित्रपरिवार, सामाजिक पाठबळ, आर्थिक स्थिती) यांचा प्रभाव तपासण्यात आला आहे.

## 2. संशोधनाची गरज व महत्त्व

विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती समजून घेण्यासाठी केवळ परीक्षेतील गुण पुरेसे नसतात. त्यांच्या मागील कारणांचा शोध घेणे आवश्यक असते. अनेकदा विद्यार्थी बुद्धिमान असूनही अपेक्षित शैक्षणिक प्रगती साधू शकत नाहीत. यामागे घरातील अस्थिर वातावरण, पालकांचे कमी लक्ष, अभ्यासातील साधनांची कमतरता, शिक्षकांचे अपुरे मार्गदर्शन किंवा सामाजिक दबाव ही कारणे असू शकतात.

या संशोधनाचे महत्त्व पुढीलप्रमाणे आहे:

1. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर परिणाम करणारे प्रमुख घटक ओळखता येतील.
2. शिक्षकांना अध्यापन नियोजन अधिक परिणामकारक करता येईल.
3. पालकांना मुलांच्या शैक्षणिक विकासात आपली भूमिका समजेल.
4. शाळांना विद्यार्थी-केंद्रित शैक्षणिक वातावरण तयार करण्यास मदत होईल.
5. शिक्षण क्षेत्रातील धोरणकर्त्यांना शालेय स्तरावर आवश्यक उपाययोजना आखता येतील.

## 4. संशोधनाची उद्दिष्टे

1. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर शैक्षणिक घटकांचा प्रभाव समजून घेणे.
2. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यप्रदर्शनावर सामाजिक घटकांचा परिणाम तपासणे.
3. शैक्षणिक आणि सामाजिक घटकांचा परस्पर संबंध तपासणे.

## 5. परिकल्पना

### शून्य परिकल्पना

1. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर शैक्षणिक घटकांचा कोणताही लक्षणीय प्रभाव नाही.
2. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर सामाजिक घटकांचा कोणताही लक्षणीय प्रभाव नाही.
3. शैक्षणिक आणि सामाजिक घटकांमध्ये कोणताही परस्पर संबंध नाही.

**पर्यायी परिकल्पना**

1. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर शैक्षणिक घटकांचा लक्षणीय प्रभाव आहे.
2. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर सामाजिक घटकांचा लक्षणीय प्रभाव आहे.
3. शैक्षणिक आणि सामाजिक घटकांमध्ये परस्पर संबंध आढळतो.

## 6. कार्यात्मक व्याख्या

1. **माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी:** या संशोधनात इयत्ता 8 वी, 9 वी आणि 10 वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी असे संबोधले आहे.
2. **शैक्षणिक संपादणूक:** विद्यार्थ्यांनी शाळेतील अध्ययन प्रक्रियेत, परीक्षांमध्ये, गृहपाठ, वर्गातील सहभाग आणि एकूण शैक्षणिक कामगिरीत मिळवलेली प्रगती म्हणजे शैक्षणिक संपादणूक होय.
3. **शैक्षणिक घटक:** शाळा, शिक्षक, अध्यापन पद्धती, अभ्याससाहित्य, शालेय सुविधा, गृहपाठ, वेळेचे नियोजन, अभ्यासातील नियमितता इत्यादींशी संबंधित घटकांना शैक्षणिक घटक म्हणतात.
4. **सामाजिक घटक:** कुटुंबीय वातावरण, पालकांचे शिक्षण, पालकांचे लक्ष, मित्रपरिवार, आर्थिक परिस्थिती, सामाजिक सहकार्य, घरातील शैक्षणिक वातावरण इत्यादींशी संबंधित घटकांना सामाजिक घटक म्हणतात.
5. **सर्वेक्षण पद्धती:** निवडलेल्या विद्यार्थ्यांकडून प्रश्नावलीद्वारे माहिती गोळा करून तिचे विश्लेषण करण्याच्या संशोधन प्रक्रियेला सर्वेक्षण पद्धती म्हणतात.

## 7. संशोधनाची व्याप्ती

1. प्रस्तुत संशोधन माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांपुरते मर्यादित आहे.

International Journal of Advanced Research and Multidisciplinary Trends (IJARMT)
An International Open Access, Peer-Reviewed Refereed Journal
Impact Factor: 6.4 Website: https://ijarmt.com ISSN No.: 3048-9458

2. संशोधनात शैक्षणिक आणि सामाजिक घटकांचा शैक्षणिक संपादणुकीवरील प्रभाव अभ्यासण्यात आला आहे.
3. हे संशोधन छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील एका माध्यमिक शाळेपुरते मर्यादित आहे.
4. संशोधनासाठी 100 विद्यार्थ्यांचा नमुना वापरण्यात आला आहे.
5. संशोधनात प्रश्नावलीच्या आधारे माहिती संकलित करण्यात आली आहे.

## 8. संशोधनाची मर्यादा

1. प्रस्तुत संशोधन फक्त एका शाळेतील 100 विद्यार्थ्यांपुरते मर्यादित आहे.
2. विद्यार्थ्यांनी दिलेली उत्तरे त्यांच्या स्वतःच्या प्रामाणिक प्रतिसादांवर आधारित आहेत.
3. संशोधनात फक्त प्रश्नावली साधनाचा वापर करण्यात आला.
4. माहितीचे विश्लेषण फक्त टक्केवारी पद्धतीने करण्यात आले.
5. सर्व सामाजिक आणि मानसिक घटकांचा सखोल अभ्यास या संशोधनात समाविष्ट केलेला नाही.

## 9. संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनामध्ये माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर शैक्षणिक आणि सामाजिक घटकांचा प्रभाव अभ्यासण्यासाठी वैज्ञानिक आणि पद्धतशीर दृष्टिकोन स्वीकारण्यात आला आहे. संशोधनाचा उद्देश विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यप्रदर्शनाशी संबंधित विविध घटकांचे वस्तुनिष्ठ निरीक्षण, माहिती संकलन, वर्गीकरण आणि विश्लेषण करणे हा आहे. या अभ्यासासाठी विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष माहिती संकलित करून त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक पार्श्वभूमीचा अभ्यास करण्यात आला. प्रस्तुत संशोधनात वस्तुनिष्ठता, विश्वासार्हता आणि अचूकता यांना महत्त्व देऊन सर्वेक्षणाधारित माहितीच्या साहाय्याने निष्कर्ष मांडण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर प्रभाव टाकणाऱ्या घटकांचे वास्तव स्वरूप समजून घेण्यासाठी ही पद्धती उपयुक्त ठरते.

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धतीचा (Descriptive Survey Method) अवलंब करण्यात आला. या पद्धतीद्वारे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीशी संबंधित शैक्षणिक आणि सामाजिक घटकांविषयी वस्तुनिष्ठ माहिती गोळा करून त्याचे विश्लेषण करण्यात आले. हे संशोधन परिमाणात्मक (Quantitative) स्वरूपाचे आहे. कारण या संशोधनात विद्यार्थ्यांकडून प्रश्नावलीच्या माध्यमातून संख्यात्मक माहिती संकलित करून तिचे टक्केवारीच्या साहाय्याने विश्लेषण करण्यात आले आहे.

International Journal of Advanced Research and Multidisciplinary Trends (IJARMT)
An International Open Access, Peer-Reviewed Refereed Journal
Impact Factor: 6.4 Website: https://ijarmt.com ISSN No.: 3048-9458

## 10. जनसंख्या

प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या म्हणजे छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील विविध माध्यमिक शाळांमध्ये शिक्षण घेत असलेले इयत्ता 8 वी ते 10 वीचे विद्यार्थी होय. या जनसंख्येमध्ये भिन्न सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला असून त्यांच्या शैक्षणिक संपादणुकीचा अभ्यास करण्यात येतो.

## 11. नमुना निवड

प्रस्तुत संशोधनासाठी छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील एका माध्यमिक शाळेतील एकूण 100 विद्यार्थ्यांचा नमुना निवडण्यात आला. या नमुन्यात माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला असून त्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर परिणाम करणाऱ्या शैक्षणिक आणि सामाजिक घटकांचा अभ्यास करण्यात आला. संशोधनाच्या उद्दिष्टांनुसार आवश्यक माहिती सुलभतेने उपलब्ध होण्यासाठी नमुना निवडण्यात आला. नमुना निवडण्यासाठी सुलभ नमुना निवड पद्धती (Convenient Sampling Method) वापरण्यात आली. ही पद्धती वेळ, साधने आणि उपलब्धता यांचा विचार करून संशोधनासाठी उपयुक्त ठरली. निवडलेला नमुना संशोधनाच्या स्वरूपाशी सुसंगत असून माहिती संकलनासाठी सोयीस्कर ठरला.

## 12. संशोधन साधन

प्रस्तुत संशोधनासाठी माहिती संकलनाचे प्रमुख साधन म्हणून स्वरचित प्रश्नावली वापरण्यात आली. या प्रश्नावलीची रचना संशोधनाच्या उद्दिष्टांनुसार करण्यात आली असून ती विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर प्रभाव टाकणाऱ्या शैक्षणिक आणि सामाजिक घटकांचे मापन करण्यासाठी उपयुक्त ठरते. प्रश्नावलीत एकूण 20 विधाने समाविष्ट करण्यात आली. त्यापैकी 10 विधाने शैक्षणिक घटकांशी संबंधित असून त्यामध्ये शिक्षकांचे मार्गदर्शन, अभ्याससाहित्याची उपलब्धता, शाळेतील शैक्षणिक वातावरण, गृहपाठाची सवय, नियमित उपस्थिती, वेळेचे नियोजन, शाळेतील सुविधा, अध्यापनातील स्पष्टता, अभ्यासातील सातत्य आणि परीक्षेची तयारी यांचा समावेश करण्यात आला. तसेच 10 विधाने सामाजिक घटकांशी संबंधित असून त्यामध्ये पालकांचे शिक्षण, पालकांचे शैक्षणिक लक्ष, घरातील अभ्यासाचे वातावरण, मित्रपरिवाराचा प्रभाव, आर्थिक परिस्थिती, कुटुंबातील प्रोत्साहन, सामाजिक आधार, घरातील शांतता, मोबाईल/टीव्हीचा प्रभाव आणि समाजातील शैक्षणिक जाणीव

International Journal of Advanced Research and Multidisciplinary Trends (IJARMT)
An International Open Access, Peer-Reviewed Refereed Journal
Impact Factor: 6.4 Website: https://ijarmt.com ISSN No.: 3048-9458

यांचा समावेश करण्यात आला. प्रत्येक विधानासाठी विद्यार्थ्यांना “होय”, “नाही” आणि “कधीकधी” हे प्रतिसाद पर्याय देण्यात आले.

## 13. माहिती संकलन प्रक्रिया

प्रस्तुत संशोधनासाठी माहिती संकलन प्रक्रिया नियोजनबद्ध आणि शास्त्रीय पद्धतीने पार पाडण्यात आली. सर्वप्रथम निवडलेल्या माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांची पूर्वपरवानगी घेण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांना संशोधनाचा उद्देश, स्वरूप आणि प्रश्नावली भरण्याची पद्धत स्पष्टपणे समजावून सांगण्यात आली, जेणेकरून त्यांनी प्रामाणिक व अचूक उत्तरे द्यावीत. पुढे स्वरचित प्रश्नावली निवडलेल्या विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आली. विद्यार्थ्यांनी दिलेली उत्तरे काळजीपूर्वक संकलित करण्यात आली आणि आवश्यक तेथे मार्गदर्शनही करण्यात आले. माहिती संकलन पूर्ण झाल्यानंतर सर्व प्रश्नावली तपासून त्यातील माहितीचे वर्गीकरण, संहिताकरण आणि तक्ते तयार करण्यासाठी मांडणी करण्यात आली. संकलित माहिती नंतर सांख्यिकीय विश्लेषणासाठी तयार करण्यात आली. अशा प्रकारे ही प्रक्रिया संशोधनाच्या उद्दिष्टांशी सुसंगत आणि विश्वासार्ह स्वरूपात पूर्ण करण्यात आली.

## 14. माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रस्तुत संशोधनात प्रश्नावलीद्वारे संकलित माहितीचे वर्गीकरण करून तिचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या प्रतिसादांचे तक्त्यांच्या स्वरूपात मांडणी करून टक्केवारीच्या आधारे त्यांचे अर्थनिर्वचन करण्यात आले. यामुळे शैक्षणिक आणि सामाजिक घटकांचा शैक्षणिक संपादणुकीवरील प्रभाव स्पष्टपणे समजण्यास मदत झाली.

**उद्दिष्टनिहाय विश्लेषण**

**उद्दिष्ट 1 : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर शैक्षणिक घटकांचा प्रभाव समजून घेणे**

तक्ता क्र. 1: शैक्षणिक घटकांबाबत विद्यार्थ्यांची मते

| अ.क्र. | विधान | होय | % | नाही | % | कधीकधी | % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | शिक्षकांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरते | 78 | 78% | 10 | 10% | 12 | 12% |
| 2 | अभ्याससाहित्य सहज उपलब्ध असते | 72 | 72% | 14 | 14% | 14 | 14% |
| 3 | शाळेतील वातावरण अभ्यासास पूरक आहे | 74 | 74% | 11 | 11% | 15 | 15% |
| 4 | नियमित गृहपाठामुळे अभ्यास सुधारतो | 81 | 81% | 7 | 7% | 12 | 12% |
| 5 | नियमित उपस्थितीमुळे गुण वाढतात | 84 | 84% | 6 | 6% | 10 | 10% |

International Journal of Advanced Research and Multidisciplinary Trends (IJARMT)
An International Open Access, Peer-Reviewed Refereed Journal
Impact Factor: 6.4 Website: https://ijarmt.com ISSN No.: 3048-9458

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | वेळेचे नियोजन अभ्यासात मदत करते | 76 | 76% | 9 | 9% | 15 | 15% |
| 7 | शिक्षकांच्या प्रोत्साहनामुळे आत्मविश्वास वाढतो | 79 | 79% | 8 | 8% | 13 | 13% |
| 8 | शाळेतील सुविधा अभ्यासात मदत करतात | 70 | 70% | 12 | 12% | 18 | 18% |
| 9 | परीक्षेपूर्व मार्गदर्शन उपयुक्त असते | 83 | 83% | 5 | 5% | 12 | 12% |
| 10 | नियमित अभ्यासामुळे शैक्षणिक प्रगती होते | 88 | 88% | 4 | 4% | 8 | 8% |

**निरीक्षण**

1. 78% विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे मार्गदर्शन शैक्षणिक प्रगतीस उपयुक्त असल्याचे मान्य केले.
2. 72% विद्यार्थ्यांनी अभ्याससाहित्याची उपलब्धता शैक्षणिक यशासाठी महत्त्वाची असल्याचे नमूद केले.
3. 74% विद्यार्थ्यांनी शाळेतील वातावरण अभ्यासासाठी अनुकूल असल्याचे सांगितले.
4. 81% विद्यार्थ्यांनी नियमित गृहपाठ शैक्षणिक संपादणुकीस सहाय्यकारी असल्याचे मान्य केले.
5. 84% विद्यार्थ्यांनी नियमित उपस्थितीमुळे शैक्षणिक कार्यप्रदर्शन सुधारते असे मत व्यक्त केले.
6. 76% विद्यार्थ्यांनी वेळेचे नियोजन अभ्यासात महत्त्वाचे असल्याचे सांगितले.
7. 79% विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे प्रोत्साहन आत्मविश्वास आणि अभ्यासात मदत करते असे नमूद केले.
8. 70% विद्यार्थ्यांनी शाळेतील सुविधा शैक्षणिक प्रगतीत सहाय्यकारी असल्याचे मान्य केले.
9. 83% विद्यार्थ्यांनी परीक्षेपूर्व मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगितले.
10. 88% विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास हा शैक्षणिक यशाचा प्रमुख घटक असल्याचे मान्य केले.

**अर्थनिर्वचन**

वरील तक्त्याच्या आधारे असे स्पष्ट होते की विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर शैक्षणिक घटकांचा स्पष्ट आणि सकारात्मक प्रभाव आहे.

**उद्दिष्ट 2 : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यप्रदर्शनावर सामाजिक घटकांचा परिणाम तपासणे**

तक्ता क्र. 2: सामाजिक घटकांबाबत विद्यार्थ्यांची मते

| अ.क्र. | विधान | होय | % | नाही | % | कधीकधी | % |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पालकांचे लक्ष अभ्यासासाठी उपयुक्त असते | 82 | 82% | 7 | 7% | 11 | 11% |
| 2 | घरातील शांत वातावरण अभ्यासात मदत करते | 80 | 80% | 9 | 9% | 11 | 11% |
| 3 | पालकांचे शिक्षण विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर परिणाम करते | 68 | 68% | 16 | 16% | 16 | 16% |
| 4 | मित्रपरिवाराचा अभ्यासावर प्रभाव पडतो | 75 | 75% | 12 | 12% | 13 | 13% |
| 5 | घरातील आर्थिक परिस्थिती अभ्यासावर परिणाम करते | 71 | 71% | 15 | 15% | 14 | 14% |
| 6 | कुटुंबीयांचे प्रोत्साहन शैक्षणिक प्रगतीस मदत करते | 84 | 84% | 5 | 5% | 11 | 11% |
| 7 | घरात अभ्यासासाठी स्वतंत्र वेळ मिळतो | 66 | 66% | 18 | 18% | 16 | 16% |
| 8 | मोबाईल/टीव्हीमुळे अभ्यासात व्यत्यय येतो | 73 | 73% | 14 | 14% | 13 | 13% |
| 9 | समाजातील शैक्षणिक वातावरण प्रेरणा देते | 69 | 69% | 13 | 13% | 18 | 18% |
| 10 | पालकांची अपेक्षा अभ्यासावर प्रभाव टाकते | 77 | 77% | 10 | 10% | 13 | 13% |

**निरीक्षण**

1. 82% विद्यार्थ्यांनी पालकांचे लक्ष शैक्षणिक प्रगतीस सहाय्यकारी असल्याचे सांगितले.
2. 80% विद्यार्थ्यांनी घरातील शांत वातावरण अभ्यासासाठी आवश्यक असल्याचे मान्य केले.
3. 68% विद्यार्थ्यांनी पालकांचे शिक्षण विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर प्रभाव टाकते असे नमूद केले.
4. 75% विद्यार्थ्यांनी मित्रपरिवाराचा अभ्यासावर प्रभाव असल्याचे सांगितले.
5. 71% विद्यार्थ्यांनी आर्थिक परिस्थिती शैक्षणिक कार्यप्रदर्शनावर परिणाम करते असे नमूद केले.
6. 84% विद्यार्थ्यांनी कुटुंबीयांचे प्रोत्साहन शैक्षणिक प्रगतीत महत्त्वाचे असल्याचे सांगितले.
7. 66% विद्यार्थ्यांनी घरात अभ्यासासाठी योग्य वेळ मिळत असल्याचे नमूद केले.
8. 73% विद्यार्थ्यांनी मोबाईल व टीव्हीमुळे अभ्यासात अडथळे निर्माण होतात असे सांगितले.

International Journal of Advanced Research and Multidisciplinary Trends (IJARMT)
An International Open Access, Peer-Reviewed Refereed Journal
Impact Factor: 6.4 Website: https://ijarmt.com ISSN No.: 3048-9458

9. 69% विद्यार्थ्यांनी समाजातील शैक्षणिक वातावरण प्रेरणादायी असल्याचे नमूद केले.
10. 77% विद्यार्थ्यांनी पालकांच्या अपेक्षा शैक्षणिक कामगिरीवर प्रभाव टाकतात असे मान्य केले.

**अर्थनिर्वचन**

वरील तक्त्यावरून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यप्रदर्शनावर सामाजिक घटकांचाही लक्षणीय परिणाम होत असल्याचे स्पष्ट होते.

**उद्दिष्ट 3 : शैक्षणिक आणि सामाजिक घटकांचा परस्पर संबंध तपासणे**

तक्ता क्र. 3

शैक्षणिक आणि सामाजिक घटकांच्या संयुक्त प्रभावाबाबत विद्यार्थ्यांची मते

| अ.क्र. | संयुक्त विधान | होय | % | नाही | % | कधीकधी | % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | शिक्षक आणि पालक दोघांचे मार्गदर्शन उपयुक्त असते | 86 | 86% | 5 | 5% | 9 | 9% |
| 2 | घरातील वातावरण आणि शाळेतील वातावरण दोन्ही महत्त्वाचे आहेत | 88 | 88% | 4 | 4% | 8 | 8% |
| 3 | मित्रपरिवार आणि शाळेतील अभ्यासवृत्ती यांचा परस्पर परिणाम होतो | 74 | 74% | 12 | 12% | 14 | 14% |
| 4 | घरातील प्रोत्साहन आणि शिक्षकांचे सहकार्य मिळाल्यास गुण वाढतात | 85 | 85% | 6 | 6% | 9 | 9% |
| 5 | सामाजिक आणि शैक्षणिक दोन्ही घटक विद्यार्थ्यांच्या यशासाठी आवश्यक आहेत | 91 | 91% | 3 | 3% | 6 | 6% |

**निरीक्षण**

1. 86% विद्यार्थ्यांनी शिक्षक आणि पालक दोघांचे मार्गदर्शन शैक्षणिक प्रगतीस उपयुक्त असल्याचे मान्य केले.
2. 88% विद्यार्थ्यांनी घरातील आणि शाळेतील वातावरण दोन्ही महत्त्वाचे असल्याचे सांगितले.
3. 74% विद्यार्थ्यांनी मित्रपरिवार आणि शाळेतील अभ्यासवृत्ती यांचा परस्पर संबंध असल्याचे नमूद केले.
4. 85% विद्यार्थ्यांनी घरातील प्रोत्साहन आणि शिक्षकांचे सहकार्य मिळाल्यास शैक्षणिक प्रगती वाढते असे मान्य केले.

5. 91% विद्यार्थ्यांनी सामाजिक आणि शैक्षणिक दोन्ही घटक विद्यार्थ्यांच्या यशासाठी अत्यावश्यक असल्याचे स्पष्ट केले.

**अर्थनिर्वचन**

शैक्षणिक आणि सामाजिक घटक हे स्वतंत्र नसून परस्परावलंबी आहेत आणि ते विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर एकत्रितपणे परिणाम करतात.

## 15. परिकल्पनांची पडताळणी

**परिकल्पना क्र. 1: "विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर शैक्षणिक घटकांचा कोणताही प्रभाव नाही."**

प्रस्तुत संशोधनातील माहितीचे विश्लेषण, तक्ते, टक्केवारी आणि विद्यार्थ्यांच्या प्रतिसादांच्या आधारे असे स्पष्टपणे आढळून आले की विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर शैक्षणिक घटकांचा ठळक प्रभाव पडतो. शिक्षकांचे मार्गदर्शन, अभ्याससाहित्याची उपलब्धता, शाळेतील शैक्षणिक वातावरण, नियमित उपस्थिती, गृहपाठाची सवय, वेळेचे नियोजन, अध्यापनातील स्पष्टता, शाळेतील सुविधा, अभ्यासातील सातत्य आणि परीक्षेची तयारी हे घटक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीशी प्रत्यक्ष संबंधित असल्याचे निष्पन्न झाले. विद्यार्थ्यांच्या बहुसंख्य प्रतिसादांमध्ये या घटकांना सकारात्मक मान्यता मिळालेली दिसून आली. यावरून असे दिसते की शैक्षणिक घटक विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेला दिशा देतात, अभ्यासातील सातत्य वाढवतात आणि शैक्षणिक यश संपादन करण्यासाठी प्रेरणा निर्माण करतात. त्यामुळे प्रस्तुत शून्य परिकल्पना नाकारली जाते आणि असे मान्य करण्यात येते की विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर शैक्षणिक घटकांचा लक्षणीय प्रभाव आहे.

**परिकल्पना क्र. 2: "विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर सामाजिक घटकांचा कोणताही प्रभाव नाही."**

प्रस्तुत संशोधनातील संकलित माहितीचे विश्लेषण, तक्ते आणि विद्यार्थ्यांच्या प्रतिसादांच्या आधारे असे स्पष्ट झाले की विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर सामाजिक घटकांचाही महत्त्वपूर्ण प्रभाव पडतो. पालकांचे शिक्षण, पालकांचे शैक्षणिक लक्ष, घरातील अभ्यासाचे वातावरण, मित्रपरिवाराचा प्रभाव, आर्थिक परिस्थिती, कुटुंबातील प्रोत्साहन, सामाजिक आधार, घरातील शांतता, मोबाईल/टीव्हीचा प्रभाव आणि समाजातील शैक्षणिक जाणीव हे घटक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यप्रदर्शनाशी संबंधित असल्याचे आढळून आले. विद्यार्थ्यांच्या बहुसंख्य प्रतिसादांमध्ये घरातील वातावरण, पालकांचे लक्ष आणि सामाजिक पाठबळ यांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. यावरून

असे दिसते की सामाजिक घटक विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील सातत्य, मानसिक स्थैर्य, प्रेरणा आणि शैक्षणिक प्रगतीवर थेट परिणाम करतात. त्यामुळे प्रस्तुत शून्य परिकल्पना नाकारली जाते आणि असे मान्य करण्यात येते की विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर सामाजिक घटकांचा लक्षणीय प्रभाव आहे.

**परिकल्पना क्र. 3: "शैक्षणिक आणि सामाजिक घटकांमध्ये कोणताही परस्पर संबंध नाही."**

प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांच्या प्रतिसादांचे विश्लेषण केल्यानंतर असे दिसून आले की शैक्षणिक आणि सामाजिक घटक हे एकमेकांपासून स्वतंत्र नसून परस्पर संबंधित आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शाळेतील अध्यापन, शिक्षकांचे मार्गदर्शन, अभ्याससाहित्य, शैक्षणिक वातावरण यांसारखे घटक जितके महत्त्वाचे आहेत, तितकेच घरातील अभ्यासाचे वातावरण, पालकांचे सहकार्य, कुटुंबीयांचे प्रोत्साहन, मित्रपरिवार आणि सामाजिक आधार हे घटकही महत्त्वाची भूमिका बजावतात. अनेक विद्यार्थ्यांच्या प्रतिसादांवरून असे स्पष्ट झाले की घरातील अनुकूल वातावरण आणि शाळेतील सकारात्मक शैक्षणिक वातावरण एकत्रितपणे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीत वाढ घडवून आणतात. त्यामुळे शैक्षणिक आणि सामाजिक घटकांमध्ये घनिष्ठ संबंध असल्याचे सिद्ध होते. म्हणून प्रस्तुत शून्य परिकल्पना नाकारली जाते आणि असे मान्य करण्यात येते की शैक्षणिक आणि सामाजिक घटकांमध्ये परस्पर संबंध आढळतो.

## 16. निष्कर्ष

1. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर शिक्षकांचे मार्गदर्शन, गृहपाठ, नियमित अभ्यास, वेळेचे नियोजन, शाळेचे वातावरण यांचा सकारात्मक प्रभाव दिसून आला.
2. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यप्रदर्शनावर पालकांचे लक्ष, घरातील वातावरण, मित्रपरिवार, आर्थिक परिस्थिती आणि सामाजिक पाठबळ यांचा प्रभाव आढळला.
3. शैक्षणिक आणि सामाजिक घटक हे परस्पर संबंधित असून दोन्ही मिळून विद्यार्थ्यांच्या यशावर परिणाम करतात.
4. घर आणि शाळा या दोन्ही स्तरांवरील समर्थन विद्यार्थ्यांच्या प्रगतीस महत्त्वाचे ठरते.
5. मोबाईल, टीव्ही आणि सामाजिक विचलन यांसारखे घटक विद्यार्थ्यांच्या अभ्यासात अडथळा निर्माण करतात.

## 17. चर्चा

प्रस्तुत संशोधनातून असे दिसून आले की विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक ही बहुआयामी स्वरूपाची आहे. केवळ शाळेतील अध्यापन चांगले असूनही घरातील वातावरण अनुकूल नसेल तर विद्यार्थ्यांची कामगिरी कमी होऊ शकते. त्याचप्रमाणे घरातील पाठबळ चांगले असूनही शाळेत प्रेरणादायी शैक्षणिक वातावरण नसेल तरही शैक्षणिक प्रगती अपेक्षेप्रमाणे होत नाही. या संशोधनातील निष्कर्षांवरून हे स्पष्ट होते की विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक प्रगतीसाठी शिक्षक, पालक, शाळा आणि समाज या सर्वांची एकत्रित भूमिका महत्त्वाची आहे.

## 18. शिफारसी

1. विद्यार्थ्यांसाठी शाळेत मार्गदर्शन व समुपदेशन कार्यक्रम आयोजित करावेत.
2. पालकांसाठी शैक्षणिक जागरूकता कार्यक्रम घेण्यात यावेत.
3. विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाचे वेळापत्रक व अध्ययन कौशल्य प्रशिक्षण द्यावे.
4. घरातील अभ्यासासाठी शांत व अनुकूल वातावरण निर्माण करण्यास पालकांना प्रोत्साहन द्यावे.
5. मोबाईल आणि टीव्हीच्या वापराबाबत शिस्तबद्ध नियोजन आवश्यक आहे.
6. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा, आत्मविश्वास आणि अध्ययन सातत्य निर्माण करावे.
7. शाळांनी विद्यार्थी-केंद्रित आणि सहायक शैक्षणिक वातावरण विकसित करावे.

## 19. निष्कर्ष

प्रस्तुत संशोधनातून असे स्पष्ट होते की माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर शैक्षणिक आणि सामाजिक दोन्ही घटकांचा महत्त्वपूर्ण प्रभाव पडतो. शिक्षकांचे मार्गदर्शन, नियमित अभ्यास, गृहपाठ, शाळेतील वातावरण, पालकांचे लक्ष, घरातील शैक्षणिक वातावरण, कुटुंबीयांचे प्रोत्साहन आणि मित्रपरिवार यांसारखे घटक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यप्रदर्शनात निर्णायक भूमिका बजावतात.

विद्यार्थ्यांच्या यशस्वी शैक्षणिक प्रगतीसाठी शाळा आणि घर यांचा परस्पर समन्वय अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी शिक्षक, पालक आणि समाज या तिन्ही स्तरांवर समन्वित प्रयत्न करणे गरजेचे आहे.

## 20. संदर्भ


1. करंदीकर सुरेश, (2008), शैक्षणिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर
2. घोरमोडे के. यु., (2008), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, विद्या प्रकाशन, नागपुर
3. जगताप ह. ना., (2005), शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, नित्यनूतन प्रकाशन, पुणे
4. जोशी विनय, (2010), विद्यार्थी विकास आणि ताण, डायमंड पब्लिकेशन, पुणे
5. दांडेकर वा. ना., (2007), शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, श्रीविद्या प्रकाशन, पुणे
6. पंडीत र. वि., (2004), शैक्षणिक मानसशास्त्र, पिंपळापुरे आणि सन्स पब्लिशर्स, नागपूर
7. पवार. ना. ग., (2009), शिक्षण आणि सामाजीकरण,नूतन प्रकाशन, पुणे
8. पाटील लीला, (2003), आजचे शिक्षण:आजच्या समस्या, विद्या प्रकाशन, पुणे
9. पानसे रमेश, (2003), माध्यमिक शिक्षण, ग्राममंगल प्रकाशन, पुणे
10. बरकले रामदास, पिचड नलिनी, (2010), शैक्षणिक मानसशास्त्र, इनसाइट पब्लिकेशन, नाशिक
11. शेवतेकर शारदा, (2004), विकासाचे व अध्ययनाचे मानसशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर
12. सोनवणे संजीव, कागदे शोभा, खैरे गौरी, (2012), प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र विकास व अध्ययन, निराली प्रकाशन, पुणे